# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.03.2025** **वार:गुरुवार**

---

1. विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित, पुढील अधिवेशन 30 जून पासून
2. तीस लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर 6 टक्के कर लावण्याचा निर्णय मागे
3. बँकींग कायदे विधेयकाला संसदेची मान्यता. वारसांची कमाल संख्या चार करण्याची तरतूद आणि
4. खेलो इंडिया पॅरा स्पर्धांचा आज समारोप. महाराष्ट्र पदक तालिकेत पाचव्या स्थानावर.

अधिवेशन

विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन काल संस्थगित करण्यात आलं. या अधिवेशनात 19 बैठका झाल्या आणि एकंदर 146 तास कामकाज झालं, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. या पुढील म्हणजेच पावसाळी अधिवेशन 30 जूनपासून सुरू होणार आहे.

तीस लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर 6 टक्के कर लावण्याचा निर्णय घेतला होता, मात्र मंत्रीमंडळात झालेल्या चर्चेनुसार हा कर लावला जाणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाचं उत्तरात सांगितलं. सर्व सरकारी वाहनं तसंच मंत्र्यांची वाहनं टप्प्याटप्प्यानं इलेक्ट्रिक करण्यात येतील आणि आमदारांना यापुढे फक्त इलेक्ट्रिक वाहनांसाठीच कर्ज दिलं जाईल असंही त्यांनी सांगितलं.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या धर्तीवर राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षाही वर्णनात्मक पद्धतीनं घेण्याचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही असं मुख्यमंत्र्यांनी काल विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. ही परीक्षा पद्धती विद्यार्थ्यांच्या हिताची आहे, असं ते म्हणाले.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, खो-खो विश्वचषक स्पर्धा या बरोबरच तेहरानमधील कबड्डी स्पर्धा यामध्ये खेळाडूंनी केलेल्या चमकदार कामगिरीबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत अभिनंदनपर प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात आला. या अधिवेशनात दोन्ही सभागृहात मिळून 12 कायदे संमत करण्यात आले असून राज्यासमोरच्या मुद्यांवर पूर्ण चर्चा केली अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनानंतर पत्रकार परिषदेत दिली. विधानसभा विरोधी पक्षनेते निवडीत सरकारची काहीही भूमिका नाही, तो अध्यक्षांचा निर्णय आहे आणि अध्यक्ष स्वतंत्र आहेत असं त्यांनी स्पष्ट केलं.

विरोधकांनी राज्याच्या विकासाचे मुद्दे सभागृहात मांडण्याऐवजी पायऱ्यांवर आंदोलन केल्याची टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. 50 शहरांचे विकास आराखडे मंजूर केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. तर मूलभूत विषयांना सरकारनं बगल दिली, अनेकदा विरोधी पक्षाला बोलू न देण्याची भूमिका सत्ताधाऱ्यांनी घेतली अशी टिका विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली.

**अण्णा बनसोडे**

विधानसभेच्या उपाध्यक्षपदी अण्णा बनसोडे यांची काल निवड करण्यात आली. यासाठी एकच अर्ज आल्यामुळे ही निवड बिनविरोध झाली असल्याचं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. एक सामान्य कार्यकर्ता विधानसभेचा उपाध्यक्ष होतो, हे आपल्या संविधानाचे सामर्थ्य आहे अश्या शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बनसोडे यांचं अभिनंदन केलं.

**बँकींग**

संसदेनं बँकिंग कायदे (सुधारणा) विधेयक 2024 मंजूर केलं आहे. या विधेयकात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा 1934, बँकिंग नियमन कायदा 1949, स्टेट बँक ऑफ इंडिया कायदा 1955, बँकिंग कंपन्या (अधिग्रहण आणि हस्तांतरण उपक्रम) कायदा 1970 आणि बँकिंग कंपन्या (अधिग्रहण आणि हस्तांतरण उपक्रम) कायदा 1980 मध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. या विधेयकात प्रत्येक बँक खात्यात वारस व्यक्तींसाठीचा पर्याय सध्याच्या एकऐवजी चार करण्याचा प्रस्ताव आहे. बँकांना त्यांच्या लेखापरीक्षकांचं मानधन ठरविण्याचा अधिकारही देण्यात आला आहे.

**कार्बन-डेटींग**

भारतातली पहिली कार्बन डेटिंग कालमापन सुविधा मुंबई विद्यापीठात पूर्ण क्षमतेनं कार्यान्वित झाली आहे. 20 कोटी रुपयांचा खर्च करून तयार करण्यात आलेल्या या सुविधेविषयी हा एक वृत्तांत.....

***भूतकाळात डोकावून बघायला प्रत्येकालाच आवडतं. मात्र पुरातन काळातील वस्तु, वास्तु आणि वारसा स्थळांवर मिळणारे अवशेष यांचा योग्य कालखंड आणि सत्यता तपासणं हे पुरातत्वशास्त्रज्ञांसाठी कायमच आव्हानात्मक असतं. अश्या वेळी मुंबई विद्यापीठात सुरू झालेल्या या केंद्राकडे 50 हजार वर्षापूर्वी पर्यंतच्या इतिहासाची अचूक नोंद घेण्याची क्षमता आहे. रेडिओकार्बन डेटिंगच्या सहाय्यानं कार्बनच्या किरणोत्सर्गी गुणधर्माचा वापर करून एखाद्या ठिकाणी किंवा एखाद्या सेंद्रिय पदार्थ असलेल्या वस्तूचे वय निश्चित केलं जातं. लाकडापासून ते अन्न, परागकण, मलमूत्र, अगदी मृत प्राणी आणि माणसांपर्यंत सर्व गोष्टींचा अचूक कालखंड यामुळे निश्चित करता येतो. भारताला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. इथल्या संस्कृती आणि इतिहासाची उकल करण्यास या केंद्राचा विद्यार्थी, संशोधकांना मोठा फायदा होणार आहे. जगात केवळ 45 ठिकाणी ही सुविधा उपलब्ध असून मुंबई विद्यापीठातल्या या केंद्रामुळे पुरातत्वशास्त्राबरोबरच बायोमेडिकल आणि अणूऊर्जेच्या संशोधनासाठी या केंद्राचा उपयोग होणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी विनीत मासावकर यांच्या सह मेघना देशपांडे पुणे.***

**छ.शिवाजी महाराज महाअभियान**

नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित समस्या तातडीनं सोडवण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर महाअभियान' हाती घेण्यात आलं आहे. हे अभियान सर्वसामान्यांसाठी वरदान ठरणार असल्याचा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात व्यक्त केला. प्रत्येक महसूली मंडळात वर्षातून चार वेळा हे शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. राज्यातील प्रमाणपत्रे, दाखले, तसंच शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी नागरिकांना वारंवार येण्याची गरज पडणार आही. या अभियानामुळे महसूल विभागाशी संबंधित सर्व तक्रारी आणि अर्ज एका ठिकाणी हाताळले जाणार आहेत.

**बालपणीच्या कविता**

'बालपणीचा काळ सुखाचा' असं आपण कायमच म्हणतो. हा काळ रम्य, सुखाचा बनविण्यामध्ये महत्त्वाचा वाटा असतो तो बडबडगीतांचा ! बोबड्या बोलांमधून उमटणाऱ्या या बडबडगीतांनी अनेक पिढ्यांचं बालपण समृद्ध केलं आहे. याच गीतांच्या जतन- संवर्धनासाठी आता केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं कंबर कसली आहे. त्याबाबतचा हा वृत्तांत....

***'मराठी मुलांचं बालपण सुरू होतं ते 'इथं इथं बस रे मोरा' आणि 'येरे येरे पावसा' या बडबडगीतांनी! राजा मंगळवेढेकर, शांताबाई शेळके, ग.दि. माडगूळकर, मंगेश पाडगावकर अशा दिग्गजांनी मराठी बडबड गीतांचा प्रांत समृद्ध केला. पुढे शाळेत जायला लागल्यावर 'रेन रेन गो अवे' आणि 'ट्विनकल ट्विनकल लिटिल स्टार' म्हणत या बाळपणाला नवे धुमारे फुटतात. अनेक पिढ्यांच्या गळ्यात स्थिरावलेली, आपलं भावविश्व फुलवलेली विविध भारतीय प्रादेशिक भाषा आणि इंग्लिशमधली ही बडबडगीतं, बालगाणी आणि बोलगाणी आता तुम्हाला पारितोषिकं जिंकून देऊ शकतात. ही गाणी पुढील पिढ्यांपर्यन्त पोहोचविण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं आयोजित केलेल्या या अभिनव स्पर्धेत भारतीय***

***सांस्कृतिक परिप्रेक्षाशी मिळतीजुळती असणारी बडबडगीतं तीन विभागात पाठवता येणार आहेत. 22 एप्रिलपर्यन्त सुरू राहणाऱ्या या निःशुल्क स्पर्धेची माहिती उपलब्ध आहे माय जिओव्ही या संकेतस्थळावर ! आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून स्वाती महाळंक.***

**मेळावा-सोलापुर**

सोलापूर शहरात काल आयोजित ऑक्टेव 25 या सांस्कृतिक कार्यक्रमातून ईशान्य भारतातील राज्यांतून आलेल्या सुमारे तीनशे कलाकारांनी विविध कला, संगीत, नृत्याविष्कार सादर करून ईशान्येकडील लोककला आणि लोकसंस्कृतीचं दर्शन घडविलं. सोलापूरकर रसिकांनी त्यांना मनापासून दाद दिली. विविध केंद्रीय संस्थांनी एकत्रितपणे या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं.

**पंढरपूर पूजा**

पंढरपूर इथल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या सर्व प्रकारच्या पूजांसाठी ऑनलाईन पद्धतीनं सोय श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. 1 एप्रिल ते 31 जुलै या कालावधीतील पुजांसाठी पंचवीस तारखेला एका दिवसातच नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. यामधून सुमारे 71 लक्ष रुपये देणगी मिळाली आहे.

**निधन**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि स्वयंसिद्धाच्या संचालिका कांचनताई परुळेकर यांचं काल कोल्हापूरमध्ये निधन झालं. त्या 74 वर्षांच्या होत्या. कांचनताईंनी महिला सबलीकरणाची चळवळ 33 वर्षे अखंडपणे चालवली आणि किमान 10 हजार महिलांना त्यांनी स्वत:च्या पायावर उभं केलं होतं. कांचनताईंच्या पार्थिव देहावर आज सकाळी पंचगंगा स्मशानभूमी इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

**बढे-अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या संगमनेर तालुक्यात मेंढवन गावचे जवान हवालदार रामदास बढे यांच्या पार्थिव देहावर काल लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. भारत-पाकिस्तान नियंत्रण रेषेवर कर्तव्यावर असताना बढे यांना वीरमरण आलं होतं.

**खेलो इंडिया**

नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धांच्या भारतोलन क्रीडाप्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी 2 सुवर्ण, 2 रौप्य आणि 1 कास्य अशी एकंदर 5 पदकं पटकावली आहेत. दिनेश बागडेनं सुवर्णपदकाला गवसणी घालत कालचा दिवस गाजवला. नेमबाजीत महाराष्ट्रानं 2 सुवर्ण आणि 1 रौप्य पदक जिंकून तिसरं स्थान प्राप्त केलं. स्वरूप उन्हाळकर आणि सागर कटाळेनं सुवर्णपदकं जिंकली. सर्वसाधारण तृतीय विजेतेपदकाचा करंडक स्वरूप उन्हाळकर यानं स्वीकारला. या स्पर्धांचा आज संध्याकाळी समारोप होत आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र 15 सुवर्ण, 16 रौप्य आणि 23 कास्यपदकांसह पाचव्या स्थानावर राहिला.

**पाऊस-सांगली**

सांगली जिल्ह्यात कालही वादळी वाऱ्यांसह जोराचा पाऊस झाला. विविध पिकं, द्राक्षं आणि भाजीपाल्याचं या पावसामुळं नुकसान झालं.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आकाश अंशतः ढगाळ राहील.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.